**सारिका रांजणे वि. कमलेश रांजणे**

**फौ.कि.न्या.क्र.८/२०१९ मधील नि.१० वरील आदेश**

१) अर्जदार हिने प्रस्तुत अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायदा २००५ (ज्यास यापुढे 'सदर कायदा' असे संबोधले जाईल) अन्वये तिला व मुलास प्रत्येकी १०,०००/— एकुण दरमहा रक्कम रुपये २०,०००/— दरम्यानची पोटगी दयावी याकरीता दाखल केला आहे.

२) अर्जाचे पुष्टयर्थ अर्जदार हिने प्रतिज्ञापत्र दाखल करुन अशी कथने केली आहेत की, तिचा व सामनेवालाचा विवाह दि.२० मे २०१३ रोजी झाला असुन त्यांना अद्विक नावाचा मुलगा दि.११ जुन २०१६ रोजी झाला. सामनेवाला कं.१ याने विवाहानंतर अर्जदार हिचे सर्व सोन्याचे दागिने त्यामध्ये १४ तोळयाचे सोने व इतर दागिने वेळोवेळी गहाण ठेवुन जुन २०१४ मध्ये अर्जदारच्या वडिलांकडुन सामनेवाला कं.१ व २ यांनी रक्कम रुपये ६,००,०००/— घेतलेले आहेत. विवाहानंतर अर्जदारच्या वडिलांकडुन १,००,०००/— रुपये घेतलेले आहेत. सामनेवाला कं.१ ते ५ हे अर्जदार कं.१ व २ यांच्याशी कधीच व्यवस्थित वागले नाहीत. नेहमीच तुसडपणाची वागणुक दिली. दुजाभाव केला. अर्जदार कं.१ हिला शिवीगाळ, मारहाण केली. अर्जदार कं.१ हिचा औषधोपचार, तिचा व तिचे मुलाचा सांभाळ अथवा योग्य उदरनिर्वाह केला नाही. सामनेवाला कं.१ हा पुणे येथे नोकरीस असुन त्यास दरमहा रक्कम रुपये २०,०००/— इतके उत्पन्न मिळते. तसेच शेतजमीन वडिलार्जित असुन त्याचे उत्पन्न दरवर्षाला १५,०००/— मिळते. सामनेवाला कं.५ देखील कृषी सेवक म्हणुन नोकरीस आहे. त्यामुळे सामनेवाला कं.१ याचेवर कोणतीही जबाबदारी नाही. म्हणुन अर्ज असे.

३) सदर अर्जास सामनेवाला यांनी नि.१५ कडे सविस्तर म्हणणे देऊन अर्जास पुर्णत्वाने इन्कार केला व असे कथन केले की, मुळात अर्जदार ही कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय माहेरी रहात आहे. अर्जदाराचा सांभाळ करणेस सामनेवाला तयार आहे. वस्तुतः सामनेवाला क्रं.१ हा नोकरी सुटल्यानंतर त्याने गाडीचा व्यवसाय सुरु केला होता. तो व्यवसाय चालत नसल्याने त्याने तो बंद केला आणि तो आर्थिक अडचणीमध्ये सापडलेला आहे. अशा परिस्थितीत अर्जदार ही सामनेवाला यास सोडुन माहेरी निघुन गेली आहे. सामनेवाला क्रं.१ यास कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. ते शेतकरी कुटूंबातुन असुन त्यांची जमीन अल्प व जंगल भागात असल्याने शेतीपासुन त्यांना विशेष उत्पन्न मिळत नाही. मिळणाऱ्या जेमतेम उत्पन्नातुन सामनेवाला क्रं.१ हा त्याचे आई—वडिल, भाव—भावजय यांचा उदरनिर्वाह करीत आहे. अर्जदार हिने उदरनिर्वाहाकरीता केलेली मागणी ही अवास्तव व अवाजवी अशी आहे. सदरचा अर्ज निव्वळ सामनेवाला क्रं.१ याच्याबरोबर संसार करण्याचा नाही या एकमेव उद्देशासाठी दाखल केला आहे. अर्जदार ही शारिरीक व मानसिकदृष्टया स्वतः काम करण्यास सक्षम आहे. अर्जदार क्रं.१ ही केवळ दुसऱ्या व्यवहाराच्या अट्टहासापोटी सामनेवाला यांच्याकडे नांदावयास येत नाही व अर्जदार क्रं.२ यांना देखील सामनेवालास भेटु देत नाही. त्यांनी आणलेल्या वस्तु अगर पैसेदेखील घेत नाही. करीता अर्जदार क्रं. १ हिच सामनेवाला क्रं.१ यास शिवीगाळ, दमदाटी करते. तरी अर्ज रद्द करण्यात यावा.

४) अर्ज व म्हणणे वाचले. अर्जदारतर्फे ॲड. सौ. कर्डक व सामनेवालातर्फे ॲड. श्री. चोरगे यांचा प्रदीर्घ युक्तीवाद ऐकला.

५)	सदर अर्जाच्या अनुशंगाने खालील मुद्दे उपस्थित होत असुन त्याचे कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदविलेले आहेत —

| **अ.नं.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
| --- | --- | --- |
| १. | अर्जदार क्रं.१ हिने ती कौटुंबिक हिंसाचाराची पिडीत महिला असल्याचे शाबीत केले आहे का ? | होकारार्थी |
| २. | अर्जदार क्रं.१ व २ हे सामनेवाला क्रं.१ यांचेकडुन दरमहा प्रत्येकी १०,०००/— अशी एकुण २०,०००/— दरम्यानची पोटगी मिळणेस पात्र आहे का ? | अंशत: होकारार्थी अर्जदार क्रं.१ हिला द.म. अंतरीम पोटगी र.रु.५,०००/— व अर्जदार क्रं.२ याला द.म. अंतरीम पोटगी र.रु.३,०००/— |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**वादप्रश्न क्रं.१ :—**

६)	अर्जदार हिने सदर कायदयाखाली दाखल केलेल्या मुळच्या अर्जामध्ये तिला झालेल्या शारिरीक व मानसिक हिंसाचाराबाबत सन २०१४ ते सन २०१९ पर्यंत हिंसाचाराची कथने नमुद केलेली आहेत. तसेच शाब्दीक व भावनिक हिंसाचार, सामनेवाला क्रं.१ ते ५ यांच्याकडुन होत असलेला हिंसाचार याबाबतची सविस्तर कथनेदेखील केलेली आहेत. तसेच अभिलेखावर अर्जदार हिने लग्नपत्रिका, फोटो, महिला समुपदेशन केंद्र, सातारा यांच्याकडे दि. २६/०४/२०१९ रोजी दिलेला तक्रारी अर्ज, त्यानंतर अदखलपात्र गुन्हयाबाबत जो नितीन दत्तात्रय भिलारे यांनी सामनेवाला क्रं.१ यांच्याविरुद्ध दाखल केला होता त्याची प्रत, समुपदेशन केंद्र, सातारा यांच्यासमवेत मिटींग दि.१५/०५/२०१९ रोजीचा कागद, सोने व दागिने खरेदी केल्याबाबतच्या

पावत्या इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

७) समुपदेशनातील मिटींगमधील अहवाल पाहता सामनेवाला क्रं.१ याने धंदयामध्ये नुकसान झाले त्यावेळी सन २०१४ साली अर्जदार हिचे वडिलांकडुन रुपये ६,००,०००/— उसने घेतले व त्या पैशाचे दरमहा २१,०००/— व्याज अर्जदार क्रं.१ च्या वडिलांनी भरले आहेत. पाच वर्षे झाले तरी एकही रुपया परत केला नाही. सदरची रक्कम अर्जदार हिच्या आई—वडिलांनी व्याजाने काढुन दिलेली होती आणि मुंबईची रुम त्यांनी विकली होती. अर्जदार सामनेवाला क्रं.१ याच्यासोबत नांदावयास जाण्यास तयार आहेत. त्यामध्ये सामनेवाला क्रं.१ यांनी अर्जदारचे हे कथन मान्य केले व रक्कम देखील थोडेथोडे त्यांना जसे ॲडजस्ट होईल त्याप्रमाणे देतील असे कथन करुन अर्जदार क्रं.१ हिला नांदावयाची तयारी दर्शवली. सामनेवाला क्रं.१ यांनी पाच वर्षे मी थोडेथोडे पैसे परत करीन असे म्हटले व पैसे दिले नाहीत व त्यामुळेच दोघांमध्ये वाद होतात. त्यामुळे अर्जदार ही कायदेशीररित्या जाणार आहे व त्याप्रमाणे समुपदेशनामध्ये त्यांना तसा सल्ला दिला. तत्पुर्वी अर्जदार हिचा दि.२६/०४/२०१९ रोजीच्या महिला समुपदेशन केंद्र, सातारा यांच्याकडील अर्जामध्ये तिने कौटुंबिक हिंसाचाराची सर्व कथने नमुद केलेली आहेत आणि तिला दिलेल्या मानसिक व शारिरीक त्रासाची कथनेदेखील तिने नमुद केलेली आहेत. अशा सर्व परिस्थितीत समुपदेशन केंद्राकडे मिटींगमध्ये अर्जदार क्रं.१ हिने सांगितल्याप्रमाणे फक्त त्याच कारणासाठी दोघांमध्ये वादविवाद होत होता हेच फक्त या अर्जाच्याकामी ग्राहय धरण्यात येणे योग्य व कायदेशीर नाही असे मला वाटते. कारण सदर कायदयाच्या कलम ३ नुसार कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या व स्वरुप हे विस्तृत स्वरुपाचे असे आहे. तसेच अर्जदारच्या वकिलांचा युक्तीवाद विचारात घेता सामनेवाला क्रं.१ ते

५ यांनी अर्जदारवर आर्थिक हिंसाचार केला आहे. आर्थिक परिस्थितीचा गैरफायदा घेतला आहे. अर्जदार ही सामनेवाला क्र.१ ची सख्ख्या आत्याची मुलगी आहे. सामनेवाला क्र.१ ने मुलाचा कोणताही पालनपोषणाचा उपाय केला नव्हता. अर्जदार क्र.१ व २ यांना सांभाळण्याची जबाबदारी सामनेवाला क्र.१ ची आहे. अर्जदार हिच्यावर होमिओपॅथीक औषधोपचार चालु आहेत. त्याबाबतही कोणतीही काळजी सामनेवाला क्र.१ ने घेतली नाही.

८) याउलट सामनेवालाचे वकील यांनी युक्तीवादामध्ये अर्जदार ही शिक्षीत असुन सामनेवाला क्र.१ चा नोकरीचा पुरावा दाखल केला नाही. मुळात अर्जदार हिचा हट्ट पुणे येथे राहण्याचा होता. सामनेवालाची आर्थिक स्थिती चांगली नाही. इतर सर्व सामनेवाले घोटेघर येथे राहतात. मंदी आल्याने आणि सामनेवालाचा धंदा बुडाल्याने त्याने वेळेत अर्जदार क्र.१ चे घेतलेले पैसे परत दिले नाहीत. पैशाच्या कारणावरुन अर्जदार क्र.१ ही नांदायला येत नसेल तर पोटगी देण्याचे कोणतेही कारण नाही. सहा वर्षात कोणतीही तक्रार अर्जदार हिने केली नाही. निव्वळ पैशावरुनच वाद झालेले आहेत. शेतीचे उत्पन्न पाठवित असतात हे अर्जदार हिने कुठेही नाकारलेले नाही. शेतीमध्ये इतर चार हिस्सेदार आहेत. मुलाचा उदरनिर्वाहाचा खर्च करणेस सामनेवाला क्र.१ तयार आहे. सामनेवाला क्र.१ नवीन नोकरीच्या शोधात आहे. एकंदरीत सर्व कथने पाहता अर्जदार क्र.१ ही पोटगी मिळणेस अपात्र आहे. तिला स्वत:ला कोणताही आर्थिक हिंसाचार झालेला नाही. कौटुंबिक घटना अहवाल पाहता पैशावरुन वाद झाला आहे असे स्पष्ट दिसते.

९) सदर कायदयाचे कलम २३ पोटकलम २ ची तरतुद पाहता न्यायालयास सदर कायदयाच्या तरतुदीखाली दरम्यान पोटगीचे आदेश पारीत करता येतात. तसेच सदर कायदयाच्या कलम ३ मधील स्पष्टीकरण २ आणि

पोटकलम IV मधील आर्थिक हिंसाचाराची व्याख्या पाहता आणि अर्जातील प्रथमदर्शनी कथने पाहता अर्जदार क्रं.१ ही कौटुंबिक हिंसाचाराची पिडीत महिला आहे हे तिने शाबीत केले आहे. **म्हणुन मी वादप्रश्न क्रं.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.**

**<u>वादप्रश्न क्रं.२</u> :—**

१०) अर्जदार क्रं.१ हिने सामनेवाला क्रं.१ कडुन तिचे स्वत:करीता व अर्जदार क्रं.२ मुलाकरीता एकुण रक्कम रुपये २०,०००/— दरमहा पोटगीची मागणी केली आहे. तथापी, सामनेवाला क्रं.१ यांचा कोणताही उत्पन्नाचा दाखला, तो दरमहा रक्कम रुपये २०,०००/— कमवतो हे दाखविण्याकरीता अर्जदार हिने कोणताही पुरावा दाखल केला नाही. तसेच अर्जदार क्रं.१ व २ यांना दरमहा प्रत्येकी १०,०००/— खर्च येतो याबाबतही कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत. वस्तुत: अर्जदार क्रं.२ अद्विक हा तीन वर्षांचा असुन अर्जदार क्रं.१ चे सोबत अर्जदारचे माहेरी रहात आहे. सामनेवाला यांचा शेती व्यवसाय असल्याचे सामनेवाला क्रं.१ ते ५ यांनी कुठेही नाकारलेले नाही. त्यामध्येही इतर लोकांचे हिस्से आहेत आणि त्यातुन काहीतरी उत्पन्न मिळते ही बाब सामनेवालाच्या मिळकतीचा ७/१२ उतारा अभिलेखावर दाखल करुन स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे सामनेवाला क्रं.१ याचा सदर मिळकतीत हिस्सा आहे. अर्जदार क्रं.२ याची शाळेची फी ऑगस्ट २०१९ या महिन्याकरीता १०,०००/— रुपये अशी दाखविलेली आहे आणि त्याकरीता म्हणुन फीची पावती अभिलेखावर दाखल आहे. तसेच अर्जदार क्रं.१ हिचे वैदयकीय कागदपत्रे देखील अभिलेखावर दाखल केले असुन सामनेवाला क्रं.१ याची शिवनेरी इंडस्ट्रीयल सर्व्हीस, मुंबई व संस्था अधिनियम १९४८ कडील शॉप ॲक्टचा दाखला भोसरी, पुणे येथील अभिलेखावर दाखल केला आहे व

सामनेवाला क्रं.१ यांचे व्हिजीटींग कार्ड देखील दाखल केले आहे. यावरुन प्रथमदर्शनी सामनेवालाकडे चांगले उत्पन्नाचे साधन असुन जाणुनबुजून हेतुपुरस्सर अर्जदार क्रं.१ व २ यांची तो कोणत्याही प्रकारे पालनपोषणाची, औषधोपचाराची व कपडालत्ताची जबाबदारी घेत नाही हे स्पष्ट होते. अशास्थितीत अर्जदार व सामनेवाला यांच्या कौटुंबिक व आर्थिक परिस्थितीचा विचार करता सामनेवाला क्रं.१ याने अर्जदार क्रं.१ हिला दरम्यानची पोटगीपोटी दरमहा रक्कम रुपये ५,०००/— व अर्जदार क्रं.२ मुलगा यास शैक्षणिक खर्चापोटी दरमहा रक्कम रुपये ३,०००/— अशी एकुण पोटगी रक्कम रुपये दरमहा ८,०००/— अर्ज दाखल तारखेपासुन ते मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत देत रहावी असा आदेश करणे योग्य होईल. **म्हणुन मी वादप्रश्न क्रं.२ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवित आहे.**

**<u>वादप्रश्न क्रं.३</u> :—**

११) ज्याअर्थी वादप्रश्न क्रं.१ चे उत्तर होकारार्थी व वादप्रश्न क्रं.२ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदविलेले असल्याने वादप्रश्न क्रं.३ चे उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे —

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशत: मंजुर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्रं.१ यांनी अर्जदार क्रं.१ हिला तिचे स्वत: करीता म्हणुन दरमहा रक्कम रुपये ५,०००/— दरम्यान पोटगी व अर्जदार क्रं.२ मुलगा अद्विक याची अ.पा.क. म्हणुन दरमहा रक्कम रुपये ३,०००/— दरम्यान पोटगी अशी एकुण रक्कम रुपये ८,०००/—दरमहा दरम्यान पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन ते मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत देण्यात यावी.

३. सदर हुकूमाच्या प्रती अर्जदार व सामनेवाला यांना विनामुल्य देण्यात याव्यात.

४. अर्जाच्या खर्चाबाबतचा विचार मुळ अर्जाचेकामी केला जाईल.

(शैलेश उ. कंठे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
महाबळेश्वर.

दि.१४/११/२०१९